दिवाणी अर्ज क्र. 226 / 2022
पांडुरंग विरूध्द परबत व इतर 6
MHLA130000692023

## आदेश नि.क्र.17

गैरअर्जदार क्रं 1 ते 5 आणि 7 यांचे विरूध्द दिनांक 09 / 12 / 2022 रोजी पारीत करण्यात आलेला ''विना म्हणणे'' चा आदेश रददबातल होण्यासाठी गैरअर्जदार क्रं 1 ते 5 आणि 7 प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत गैरअर्जदार क्रंमाक 1 ते 5 आणि 7 यांनी शपथपत्र दाखल केलेले आहे.

2. गैरअर्जदार यांनी असे नमूद केले की, गैरअर्जदार क्रमांक 2 हे आजारी होते, त्यामुळे गैरअर्जदार यांच्याकडून पुरेशी म्हणणे सादर करण्यास पुरेशी माहिती प्राप्त झाली नाही. तसेच यांच्याकडे म्हणणे दाखल करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची उपलब्धता मुदतीमध्ये म्हणणे दाखल करू शकले नाहीत. त्यामुळे गैरअर्जदार क्रं 1 ते 5 आणि 7 यांचे विरूध्द दिनांक 09 / 12 / 2022 रोजी पारीत करण्यात आलेला ''विना म्हणणे'' चा आदेश रददबातल करण्यात यावा हि विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

3. यावर अर्जदार यांनी आक्षेप नोंदवलेला आहे. गैरअर्जदार क्रंमाक 1 ते 5 आणि 7 यांना मुदतीत समंन्स तामील झाले होते. गैरअर्जदार क्रंमाक 1 ते 5 आणि 7 यांनी अर्जदारमध्ये दिलेले कारण चुकीचे आहे. गैरअर्जदार क्रंमाक 1 ते 5 आणि 7 यांनी गैरअर्जदार क्रं 2 हे आजारी होते याबाबत कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांनी जाणुनबुजुन अर्जदारास त्रास होण्याच्या हेतुने लेखी म्हणणे दाखल केलेले नाही. तरी गैरअर्जदाराचा अर्ज योग्य त्या दंडासह खारीज करण्यात यावा ही विनंती.

4. प्रस्तूत अर्ज अर्जदाराने पोलीस संरक्षण मिळण्याकरीता दाखल केलेला दाखल केला आहे. गैरअर्जदार यांना समंन्स स्वीकारून अर्जामध्ये हजर झालले आहेत. गैरअर्जदार अर्जासोबत त्यांची म्हणणे दिलेले आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीने व वाद प्रश्न गुण दोषावर कायमस्वरूपी निकाली होण्याकरीता एकतर्फा आदेश रद्द करणे व बचावाची संधी गैरअर्जदार क्रमाक 1 ते 5 आणि 7 यांना देणे योग्य आहे. मात्र त्यासोबत उशिरामुळे झालेल्या त्रासासाठी अर्जदार यांना भरपाई द्यावी असा आदेश देणे गरजेचे आहे. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

1. गैरअर्जदार क्रमाक 1 ते 5 आणि 7 यांचे विरूध्द दिनांक 09/12/2022 रोजी पारीत करण्यात आलेला ''विना म्हणणे'' चा आदेश रक्कम रूपये 200/- खर्च बसवुन रददबातल करण्यात येतो.
2. खर्चाची रक्कम अर्जदाराला देण्यात यावी.
3. खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर गैरअर्जदार क्रमांक 1 ते 5 आणि 7 यांचे लेखी म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात यावे.

एस.डी.

**दिनांक 14/02/2023** **( आर.बी.हनवते )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रेणापूर**